# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०२.०६.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (२७.०५.२०२६ ते ०२.०६.२०२६) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०३.०६.२०२६ ते ०७.०६.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ | दिनांक | | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | | १५ | ८ | १२ | ९ | ६ |
| ३६.२ | ३४.० | ३६.२ | ३६.४ | ३६.५ | ३६.० | ३७.४ | कमाल तापमान (अं.से.) | | ३६ | ३५ | ३५ | ३६ | ३६ |
| २४.० | २३.६ | २३.८ | २५.२ | २५.५ | २४.४ | २४.२ | किमान तापमान (अं.से.) | | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ४ | ५ | ३ | २ | ८ | ४ | २ | स. | ढग स्थिती (आकाश) | ४ | ५ | ६ | ६ | ५ |
| ० | ० | २ | ८ | २ | ६ | | दु. | | | | | | |
| ८१ | ८२ | ८१ | ७७ | ८० | ७५ | ७२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ७४ | ७२ | ७४ | ७४ | ७४ |
| ५० | ५० | ४७ | ५० | ४६ | ५० | ४६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ५० | ५७ | ६० | ७० | ६५ |
| ३.५ | ४.४ | ४.९ | ५.२ | ३.४ | ४.८ | ३.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | ६ | १० | १२ | ११ | ९ |
| नै. | वा. | नै. | प. नै. | नै. | वा. | ई. | स. | वाऱ्याची दिशा | प.वा. | प. | प.नै. | प.नै. | नै. |
| प. | द.नै. | नै. | नै. | नै. | नै. | नै. | दु. | | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० | १००.८ | ६ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|---|
| हवामान सारांश | | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ३, ४, ५, ६ व ७ जून रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ३, ४, ५, ६ व ७ जून रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ७ जून पर्यंत कमाल तापमान ३५.० ते ३६.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २५.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ७२ ते ७४%, दुपारची सापेक्ष आद्रता ५० ते ७०% तसेच वाऱ्याचा वेग ताशी ०६ ते १२ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान इशारा | | ०२.०६.२६ | कोल्हापूर जिल्हा व जिल्ह्यातील घाट भागांमध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट व ताशी ५० ते ६० किमी वेगाच्या वाऱ्यासह गारा पडण्याची शक्यता आहे |
| | | ०३.०६.२६ | कोल्हापूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस आणि ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता.<br>घाट भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता. |
| | | ०४.०६.२६ | कोल्हापूर जिल्हा व घाट भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस आणि ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता. |
| | | ०५.०६.२६ | कोल्हापूर जिल्हा व घाट भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता. |
| | | ०६.०६.२६ | कोल्हापूर जिल्हा व घाट भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता. |
| सामान्य सल्ला | | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ वेलवर्गीय व उंच वाढणाऱ्या भाजीपाला पिकांना आधार द्यावा. |
| संदेश | | | मेघगर्जना, विजांचा कडकडाट, जोरदार वाऱ्यासह गारा पडण्याची तसेच हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वत:ची काळजी घ्यावी तसेच जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधावे. |
| भात | रोपवाटिका | | ➢ खरीप हंगामामध्ये भाताची लागवड करण्यासाठी रोपवाटिका तयार करणेकारिता गादी वाफे तयार करून घ्यावेत.<br>➢ १ मी. रुंदीचे, १५ सें.मि. उंचीचे आणि आवश्यकतेनुसार लांबीचे गादीवाफे तयार करावेत. १ हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीसाठी १० गुंठे क्षेत्रावरील रोपवाटिका पुरेशी होते.<br>➢ खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| मका | पेरणीपूर्व | | ➢ जमिनीची निवड: धान्यासाठी तसेच चाऱ्यासाठी मध्यम ते भारी, खोल, रेतीयुक्त, उत्तम निचऱ्याची, अधिक सेंद्रिय पदार्थ आणि |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | तयारी | जलधारणा शक्ति असलेली जमीन चांगली. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ असावा.<br>➢ पूर्व मशागत : जमिनीची खोल (१५ ते २० सें.मी.) नांगरट करावी. कुळवाच्या २-३ पाळया देऊन जमीन भूसभुशीत करावी. शेवटच्या कुळवाच्या पाळीच्या वेळी हेक्टरी १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत चांगले मिसळावे. |
| भुईमूग | पूर्व मशागत | ➢ जमीन: मध्यम खोलीची, भुसभुसित, सेंद्रिय पदार्थ योग्य प्रमाणात असलेली व पाण्याचा उत्तम निचरा होणारी<br>➢ पूर्व मशागत : एक नांगरट व कुळवाच्या २-३ पाळया द्याव्यात<br>➢ भरखते : पूर्व मशागतीच्या वेळी शेवटच्या कुळवाच्या आगोदर प्रती एकरी ४ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीमध्ये मिसळावे.<br>➢ खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| सोयाबीन | पूर्व मशागत | ➢ जमीन: मध्यम खोलीची चांगली निचरा होणारी<br>➢ पूर्व मशागत : एक नांगरट व कुळवाच्या २-३ पाळया देऊन जमीन भूसभुशीत करावी.<br>➢ भरखते : चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत हेक्टरी १२ ते १५ टन शेणखत मिसळावे.<br>➢ खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| मूग | पूर्व मशागत | ➢ जमीन : मध्यम ते भारी, चांगली निचरा होणारी जमीन आवश्यक असते. पाणी साचून राहणारी, क्षारपड, चोपण किंवा अत्यंत हलकी जमीन टाळावी.<br>➢ पूर्वमशागत : चांगली पूर्वमशागत ही मूग आणि उडीदाच्या अधिक उत्पादनासाठी आवश्यक बाब आहे. यासाठी जमीन नांगरावी. ती चांगली तापू द्यावी आणि पावसाळा सुरु होताच कुळवाच्या पाळया घ्याव्यात. काडी, कचरा, धसकटे वेचून घ्यावीत. याच वेळी हेक्टरी ५ टन चांगले कुजलेले शेणखत घालावे. |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ आवश्यकतेनुसार ऊस बांधणी व इतर कामे पूर्ण करावीत.<br>➢ खोडकिडीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवून आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास नियंत्रण उपाययोजना कराव्यात. |
| टोमॅटो | वाढीची अवस्था | ➢ मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस आणि ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने रोपे उन्मळून पडू नये म्हणून काठीच्या किंवा बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा.<br>➢ गारा पडण्याचा इशारा देण्यात आलेला असल्याने शक्य असल्यास हेलनेटचा वापर करावा |
| आंबा | फळे पक्वता | ➢ गारा पडण्याचा इशारा देण्यात आलेला असल्याने शक्य असल्यास हेलनेटचा वापर करावा |
| पशुधन | वाढीची | ➢ तज्ञ पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जनावरांना जंतनाशक औषध पाजावे व शेवटच्या आठवडयात लाळखुरकत, फ-या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात. |
| पूर्व मशागत | | ➢ खरीप हंगामामध्ये पिक घेण्यासाठी जमिनीची पूर्व मशागत (नांगरणी) करून घ्यावी. खरीप हंगामामध्ये कडधान्य पिक घेण्यासाठी जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या दोन पाळया द्याव्यात व शेवटच्या कुळवणी अगोदर हेक्टरी ५ टन कंपोस्ट/शेणखत शेतात मिसळावे. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

**ठिकाण** : कोल्हापूर

**दि.** : ०२.०६.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**